# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 October 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ दुपारी १.०० वा.

****

भारत आपल्या स्वातंत्र्याच्या अगदी सुरुवातीपासूनच, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याच्या संयुक्त राष्ट्रांच्या ध्येयात खंबीरपणे उभा राहिला असल्याचं, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आज UNTCC म्हणजेच संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये योगदान देणाऱ्या देशांच्या लष्कर प्रमुखांच्या परिषदेचं उद्घाटन सिंह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. शांतता राखण्यासाठी भारतानं संयुक्त राष्ट्रांच्या एकूण ७१ शांतता मोहिमांपैकी ५१ मोहिमांमध्ये योगदान दिलं आणि भारताच्या सैन्यानं अढळ दृढनिर्धारानं सेवा दिली, असं लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी या परिषदेत सांगितलं. या तीन दिवसांच्या परिषदेत ३२ देशांचे वरीष्ठ लष्करी अधिकारी, शांतता मोहिमांमधली आव्हानं, बदलते धोके आणि भविष्यातलं सहकार्य याबाबत विचारविनिमय करणार आहेत.

****

जागतिक आरोग्य संघटनेनं भारतात उत्पादन झालेल्या तीन कफ सिरप्सना भेसळयुक्त म्हणून घोषित केलं असून, त्यात कोल्ड्रिफ या औषधाचाही समावेश आहे. ही औषधं गंभीर आणि प्राणघातक आजारांना कारणीभूत ठरू शकतात, असा इशारा जागतिक आरोग्य संघटनेनं दिला असून, जगभरातल्या कुठल्याही देशात यापैकी एखादं औषध आढळून आल्यास त्याबाबत या संघटनेला सूचना द्यावी, असं म्हटलं आहे. अशी औषधं पाच वर्षाखालच्या बालकांना देऊ नयेत, असंही जागतिक आरोग्य संघटनेनं सांगितलं आहे.

****

आगामी बिहार विधानसभा निवडणूक आणि अन्य राज्यातल्या पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी, समाज माध्यमांसहित कोणत्याही इंटरनेट आधारित वेबसाइट्स वर राजकीय जाहिराती प्रसारित न करण्याचं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे. अशा जाहिराती प्रसिद्ध करण्यापूर्वी माध्यम प्रमाणन आणि देखरेख समितीकडून प्रमाणपत्र घेणं आवश्यक असल्याचं आयोगानं म्हटलं आहे. उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज भरताना, समाज माध्यमांवरच्या आपल्या अकाऊंट्सची माहिती द्यावी, असे निर्देशही आयोगानं दिले आहेत.

****

नक्षलवादी गटाच्या पॉलिट ब्युरोचा सदस्य मल्लोउजुला वेणुगोपाल राव ऊर्फ सोनु, यानं आज साठ नक्षलवाद्यांसह गडचिरोली इथं आत्मसमर्पण केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि राज्यं सरकारांच्या नेतृत्वात पोलिस सातत्यानं राबवत असलेल्या मोहिमांमुळे नक्षलवादी शरण येत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

२०२७ पर्यंत, देशांतल्या सगळ्या नगरपालिकांमधल्या कच-याचा उपयोग रस्ते निर्मितीसाठी करण्याची, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची योजना असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. ते काल चेन्नईत एका खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दीक्षांत समारंभात बोलत होते. आतापर्यंत सुमारे ऐंशी लाख टन नगरपालिका कच-याचा उपयोग अहमदाबाद-पुणे आणि मुंबई-दिल्ली महामार्गांच्या निर्मितीसाठी केला असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

तारखेनुसार धम्मचक्र प्रवर्तन दिन आज साजरा होत आहे. नागपूरच्या दीक्षाभूमी इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह बुद्ध धम्माचा स्वीकार केला होता. दसऱ्याच्या दिवशी बाबासाहेबांनी ही दीक्षा घेतली असल्यामुळे विजयादशमीला हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्त नागपूर इथं दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन ससाई यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेलाही पुष्प अर्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. दीक्षाभूमी परिसरात मोठ्या प्रमाणात अनुयायी दाखल झाले आहेत. बाबासाहेबांचा जीवन प्रवास दाखवणारं चित्र प्रदर्शन याठिकाणी भरवण्यात आलं असून, सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कुपोषित श्रेणीत असलेल्या ६५१ बालकांना येत्या १४ नोव्हेंबर पर्यंत कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढून जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पंचसूत्री तयार केली असून, त्यानुसार महिला आणि बालविकास, आरोग्य, ग्रामविकास आणि महसूल यंत्रणांनी समन्वयानं काम करून जिल्हा कुपोषणमुक्त करावा, असे निर्देश दिले आहेत. या विभागांच्या यंत्रणांशी आज जिल्हाधिकाऱ्यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रमही जिल्हाधिका-यांनी या यंत्रणांना यावेळी दिला.

****

दिल्ली इथला वेस्ट इंडिज विरुद्धचा दुसरा कसोटी क्रिकेट सामना भारताने आज सात गडी राखून जिंकला. सामन्याच्या आजच्या पाचव्या दिवशी १२१ धावांचं लक्ष्य भारतीय संघाने तीन गडी गमावत पूर्ण केलं. या विजयासोबतच भारताने दोन सामन्यांची मालिका दोन – शून्य अशी जिंकली.

****